# <u>बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे जुन– २०१८</u>

## कांजुरमार्ग पोलीस ठाणे, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | कांजुरमार्ग पोलीस ठाणे गुरक्र.५८/२०१६ कलम ३७६(२)(एफ)(एन) भादवि सह ४,६,८,१२ पॉक्सो कायदा |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | माहे एप्रील २०१५ पासुन दिनांक ११/०४/२०१६ रोजी पर्यंत |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | चामुंडा नगर सोसायटी, वीर सावरकर मार्ग, भांडुप पुर्व मुंबई. |
| ४ | **फिर्यादी** | सौ. गौरी विनोद खारवा वय ३० वर्षे, रा.ठि. चामुंडा नगर सोसायटी, वीर सावरकर मार्ग, भांडुप पुर्व मुंबई. |
| ५ | **बळीत** | फिर्यादी यांचा १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा |
| ६ | **आरोपी अटक** | विनोद बाबू खारवा वय ४० वर्षे<br>**अटक दिनांक २३/०४/२०१६ रोजी** |

कांजुरमार्ग पोलीस ठाणे गुरक्र.५८/२०१६ कलम ३७६(२)(एफ)(एन) भादवि सह ४,६,८,१२ पॉक्सो कायदा या गुन्हयात माहे एप्रील २०१५ पासुन दिनांक ११/०४/२०१६ रोजी पर्यंत चामुंडा नगर सोसायटी, वीर सावरकर मार्ग, भांडुप पुर्व मुंबई. याठिकाणी यातील आरोपी नामे विनोंद बाबू खारवा वय ४० वर्षे यांने फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला फिर्यादी यांचे अनुपस्थितीत मागील एक वर्षांपासुन वारंवार लैंगिक अत्याचार करून सदरबाबत बळीत मुलीने कोणाजवळ वाच्यता केल्यास तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली म्हणून फिर्यादी यानी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २२/०४/२०१६ रोजी सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

कांजुरमार्ग पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्य वापरून दिनांक २३/०४/२०१६ रोजी आरोपी नामे विनोद बाबू खारवा वय ४० वर्षे यास नमुद गुन्हयात अटक केली. नमुद गुन्हयाचा सखोल तपास करून आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक १९/०७/२०१६ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे पोक्सो केस क्र. ३१२/२०१६ अन्वये सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर पथकाने मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल विहित वेळेत सादर केला. सदर पथकाने फिर्यादी व बळीत मुलीचा फौदंप्रसं कलम १६४ प्रमाणे जबाब नोंद करण्यास सहाय्य केले. तोच बळीत मुलगी व आरोपीत यांचे डीएनए सॅम्पल तपासणी कामी पाठवून व सातत्यपुर्ण पाठपुरावा करून विहित वेळेत डीएनए अहवाल मा. न्यायालयात पुराव्याकामी सादर केले. तसेच सदर पथकाने बळीत मुलीचा जबाब, ०६ पुरक साक्षीदार/०६ पंच साक्षीदार सादर करून दिनांक २२/०६/२०१८ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई यांनी आरोपी नामे विनोद बाबू खारवा वय ४० वर्षे यास शिक्षा दिली ती पुढीलप्रमाणे :–

**अ)** भादवि. कलम ३७६(२) प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**ब)** पोक्सो कायदा कलम ६ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**क)** भादवि. कलम ५०६ प्रमाणे **०२ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कारावास,

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीने एकत्र भोगायच्या आहेत. तसेच अपीलाची मुदत संपल्यावर मा. न्यायालयाने दोषसिध्द आरोपीतास केलेल्या द्रव्यदंडाची रक्कम बळीत मुलीस देण्याचे आदेश दिलेले आहेत.

फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला फिर्यादी यांचे अनुपस्थितीत मागील एक वर्षापासुन वारंवार लैंगिक अत्याचार करून सदरबाबत बळीत मुलीने कोणाजवळ वाच्यता केल्यास तिला जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीस कांजुरमार्ग पोलीस ठाणेच्या पथकाने तात्काळ अटक करून त्याचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे जुन – २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**<u>कांजुरमार्ग पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :–</u>**

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव | अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | पोनि. अनिल पिलाजी सोनावणे | ५ | पोउनि. दिपक दिलीप सुरवडकर |
| २ | पोलीस निरीक्षक मदन विष्णु पाटील | ६ | पोउनि. शाम कृष्णा निबांळकर |
| ३ | मपोउनि.नंदा अजितराव पाटील | ७ | पोशिक्र.६१७१२/भिका अकबर तडवी |
| ४ | पोहक्र.८६३१/भगवान भाऊसाहेब शेरकर | ८ | पोशिक्र.०१६०७/तुषार सखाराम तावडे |

—— ००० ——